ePaper
ठाकरे ब्रँड सुरू झाल्यावर बघा काय होतंय... उद्धव ठाकरे यांचा सूचक इशारा
| वर्ष - 9 | अंक -49 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- गिल-इमलॅच यांच्यात जोरदार धडक!
- मोहसीन नक्वींनी तर हद्दच केली!
- अफगाणिस्तानचा पाकिस्तानला इशारा!
- काबूलमध्ये पुन्हा भारतीय दूतावास


www.mahaenews.com | शनिवार, दि. 11 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पुणे महानगर पालिका निवडणूक देवेंद्र फडणवीस विरुद्ध अजित पवार

# पुण्याच्या रणांगणात महाभिडंत?

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही दिग्गज आमने-सामने

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्याच्या राजकीय रणांगणात आता सर्वांचे लक्ष पुण्याकडे लागले आहे. कारण, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भारतीय जनता पक्ष या दोन्ही पक्षांनी पुणे महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी आपापले मोर्चे सरसावले आहेत. एकीकडे राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे पक्षसंघटनेचा आढावा घेऊन कार्यकर्त्यांना स्वबळावर लढण्याचा संदेश देत आहेत, तर दुसरीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पश्चिम महाराष्ट्रातील पक्षनेते, मंत्री, आमदार आणि पदाधिकाऱ्यांसाठी हाय व्होल्टेज बैठक बोलावली आहे.**



### दिवाळीनंतर निवडणुकीचा बिगुल?

राज्यातील अनेक महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका दिवाळीनंतर जाहीर होण्याची शक्यता आहे. राजकीय पक्षांकडून यासाठी तयारी सुरू झाली आहे. भाजपकडून कार्यकर्त्यांची ताकद वाढवण्यावर भर दिला जात आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून गटबाजी थोपवून कार्यकर्त्यांना संघटित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पुणे महापालिका ही राजकीय प्रतिष्ठेची निवडणूक मानली जाते. भाजपने मागील वेळी एकहाती सत्ता मिळवली असली, तरी अजित पवार गटाने आता पुण्यात आपला प्रभाव पुन्हा प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. दोन्ही पक्षांची रणनीती एकमेकांच्या विरोधात जात असल्याने पुण्याच्या रणांगणात फडणवीस विरुद्ध अजित पवार अशी थेट लढत रंगण्याची शक्यता आहे.

या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका "स्वबळावर की महायुती म्हणून लढायच्या?" या महत्त्वाच्या प्रश्नावरही चर्चा होणार असल्याचे संकेत आहेत. परिणामी, पुण्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

### राष्ट्रवादीकडून "स्वबळावर लढाई"ची तयारी

अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यात गेल्या काही दिवसांपासून संघटन विस्तार आणि पक्षप्रवेश अभियान सुरू केले आहे. पुण्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात जनता दरबार घेऊन कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला जात आहे. आज झालेल्या बैठकीत पक्ष संघटनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला, तसेच काही नामांकित व्यक्तींनी पक्षप्रवेश केल्याची माहिती मिळाली आहे. या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी स्वबळावर लढण्याचा नारा दिला आहे, अशी स्पष्ट लक्षणे दिसू लागली आहेत. पक्षातील सूत्रांच्या मते, अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना सांगितले आहे की, "आपल्याला कोणावर अवलंबून राहायचं नाही; संघटना सक्षम आहे आणि कार्यकर्त्यांवर पूर्ण विश्वास आहे."

### भाजपकडूनही तयारीचा बिगुल

राष्ट्रवादी काँग्रेसच्या या हालचालींना उत्तर म्हणून भारतीय जनता पक्षानेही तयारी जोरात सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या पश्चिम महाराष्ट्रातील मंत्री, आमदार, पदाधिकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील माजी लोकप्रतिनिधींशी जिल्हानिहाय थेट संवाद साधणार आहेत.

या बैठकीत पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, सांगलीसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील निवडणुकांची रणनीती आखली जाणार आहे. यावेळी महायुती म्हणून निवडणूक लढवायची की स्वबळावर, या मुद्द्यावरही चर्चा होण्याची शक्यता आहे. बैठकीत आगामी जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकांचा आढावा घेण्यात येणार आहे. भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी सांगितले की, पक्ष संघटनेने निवडणुकीसाठी पूर्ण तयारी केली आहे. राज्यातील सर्व पाच विभागांत अनुक्रमे देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात येणार आहेत. नाशिकमध्ये नाशिक आणि मराठवाडा विभागाची बैठक, तर शनिवारी पुण्यात पश्चिम महाराष्ट्र विभागाची बैठक होणार आहे. कोकण विभागाची बैठक मुंबईत होईल.

### महायुती की स्वबळावर?

राज्यात सध्या सत्तेत असलेली महायुती सरकार (भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी (अजित पवार गट)) पुढील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका एकत्रितपणे लढवण्याची चर्चा वरिष्ठ पातळीवर सुरू आहे. मात्र, स्थानिक स्तरावर परिस्थिती वेगळी असल्याचे दिसून येत आहे. पुणे महानगरपालिकेच्या मागील निवडणुकीत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत झाली होती, ज्यात भाजपने तब्बल १०० जागांवर विजय मिळवला होता. त्यामुळे या वेळी जागावाटपाचं समीकरण गुंतागुंतीचं होणार असल्याचं राजकीय सूत्रांचं म्हणणं आहे.

भाजपच्या बैठकीत पुणे आणि परिसरातील जागावाटप, पक्ष प्रवेश, स्थानिक गटबाजी आणि प्रचाराची दिशा यावरही सखोल चर्चा होणार आहे. अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये "स्वबळावर लढावं" अशी मागणी पुढे येत असल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या या बैठकीत स्वबळाच्या पर्यायावर गंभीर चर्चा होण्याची शक्यता आहे.

### फडणवीसांची रणनीती आणि अजित पवारांचा आत्मविश्वास

राजकीय निरीक्षकांच्या मते, फडणवीस हे बैठका घेत भाजपचा कार्यकर्ता मोर्चा पुन्हा सक्रिय करण्याच्या तयारीत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून पश्चिम महाराष्ट्रात अजित पवार यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. त्यामुळे फडणवीस आता थेट संवादातून स्थानिक नेत्यांना एकत्र आणण्याच्या मोहीमेवर आहेत. त्याचवेळी अजित पवार यांनीही पुण्यातील संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. या दोन्ही नेत्यांमधील ही रणनीतीची स्पर्धा पुण्यातील राजकीय समीकरणावर थेट परिणाम करू शकते. राष्ट्रवादी काँग्रेसने "स्वबळावर" असा नारा दिला असताना, भाजपकडूनही त्याच दिशेने विचार सुरू असल्याचं संकेत मिळत आहेत.

## अमितेश कुमार यांच्याशी चर्चा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्पष्टीकरण

# घायवळ प्रकरणात राजकीय हस्तक्षेप नाही

## दोषींवर कठोर कारवाईची भूमिका

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'कोथरूड गोळीबार प्रकरणातील आरोपी नीलेश घायवळ याचा भाऊ सचिन याला शस्त्र परवाना देण्यासंदर्भात गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शिफारस केली असली, तरी त्याला अद्यापही शस्त्र परवाना देण्यात आलेला नाही. तर, नीलेश घायवळ याला पारपत्र (पासपोर्ट) कोणी दिला, त्यासाठी कोणी शिफारस केली, याची चौकशी करण्यात येत आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात पोलिसांची मोठी जबाबदारी असल्याने घायवळ प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होऊ देणार नाही. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत चर्चा झाली असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे,' असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.**



खडकवासला विधानसभा मतदारसंघात अजित पवार यांनी 'परिवारमिलन' कार्यक्रम घेतला. त्या वेळी धनकवडी येथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पवार म्हणाले, 'नीलेश घायवळ प्रकरणात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी चर्चा केली आहे. कोण कुठल्या गटाचा, पक्षाचा, कोणाच्या जवळचा किंवा लांबचा कार्यकर्ता आहे, कोणासोबत त्याचे छायाचित्र आहे किंवा नाही हे न पाहता कारवाईची सूचना पोलिसांना केली आहे.'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत घायवळ प्रकरणात चर्चा झाली आहे. चूक असणाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. कोण काय म्हणतो, हा ज्याचा-त्याचा प्रश्न आहे. राजकीय नेत्यांबरोबर अनेक जण छायाचित्र काढतात. नेत्याबरोबर छायाचित्र आहे म्हणजे त्यांचे संबंध आहेत, असे होत नाही. त्यामुळे चौकशी करताना केवळ छायाचित्र ग्राह्य न धरता व्यक्तींमधील संभाषण किंवा सबळ पुरावे मिळाले तरच कारवाई केली जाईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले.ते म्हणाले, 'काही वर्षांपूर्वी मी एका चुकीच्या व्यक्तीला पक्षप्रवेश दिला होता. ही बाब लक्षात आल्यानंतर मी तातडीने त्याची हकालपट्टी केली. कार्यकर्त्यांचे हात बरबटले असतील, तर पाठीशी घालायला आम्ही मोकळे नाही. सचिन घायवळला शस्त्र परवाना देण्यासाठी काहींनी शिफारस केली असली, तरी पुणे पोलीस आयुक्तांनी शस्त्र परवाना दिलेला नाही. कोणतीही शिफारस आली, तरी अर्जदाराच्या पात्रतेची आणि त्याच्या पोलीस रेकॉर्डची शहानिशा करणे हे पोलिसांचे काम आहे. एखाद्या फाईलवर रिमार्क मारल्यानंतर ती फाईल सचिवांकडे जाते. त्या वेळी अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली पाहिजे. प्रतिकूल मत असतानाही मंत्र्याच्या आग्रहाने त्यावर कार्यवाही झाल्यास तो मंत्री दोषी ठरतो.'अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना ३५ हजार कोटी रुपयांचे पॅकेज राज्य शासनाने जाहीर केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना परिस्थितीची माहिती दिली असून, त्यांनी प्रस्ताव पाठविण्याची सूचना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राज्याला आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे, असे अजित पवार यांनी सांगितले. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राबविताना काही नियम शिथिल करण्यात आले होते. मात्र, पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा, यासाठी लाभार्थ्यांच्या कागदपत्राची पडताळणी (केवायसी) बंधनकारक करण्यात आली आहे. ती करावीच लागेल पण, आवश्यकता वाटल्यास त्यासाठी मुदतवाढ दिली जाईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

### कागदपत्रांची पडताळणी आवश्यकच

मतदारसंघात अजित पवार यांनी 'परिवारमिलन' कार्यक्रम घेतला. त्या वेळी धनकवडी येथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पवार म्हणाले, 'नीलेश घायवळ प्रकरणात पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी चर्चा केली आहे. कोण कुठल्या गटाचा, पक्षाचा, कोणाच्या जवळचा किंवा लांबचा कार्यकर्ता आहे, कोणासोबत त्याचे छायाचित्र आहे किंवा नाही हे न पाहता कारवाईची सूचना पोलिसांना केली आहे.

# हातगाड्यांअगोदर मोटारींवर कारवाई करा

## श्रावण हर्डीकर यांनी आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारला

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य नागरिक, गोरगरिबांना कोणताही त्रास होता कामा नये. पदपथावर उभी केलेली वाहने, मोटारी अगोदर उचलाव्यात. त्यानंतर फेरीवाल्यांच्या हातगाड्यांवर कारवाई करावी. अतिक्रमण कारवाईत दुजाभाव होता कामा नये,' अशी सूचना महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी अधिकाऱ्यांना केली.**



तसेच सर्वसाधारण सभा, स्थायी समितीचे विषयपत्र महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार शुक्रवारी स्वीकारला. त्यानंतर विभागप्रमुखांची बैठक घेऊन त्यांनी विविध सूचना दिल्या. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे या वेळी उपस्थित होते.'शहरात नियमितपणे स्वच्छता करावी. कचरा कोठे होता कामा नये. रस्ते, पदपथांवर कचरा साचता कामा नये. जिथे कचरा दिसेल, तेथील जबाबदार अधिकाऱ्यांचे नाव मला सांगावे. पाणीपुरवठा विस्कळीत होऊ देऊ नका, पुरेसा आणि स्वच्छ पाणीपुरवठा करावा. सद्यःस्थितीत कोणतेही नवीन प्रकल्प आणू नयेत. केवळ तातडीचे प्रस्ताव आणावेत,' अशा सूचना आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या.सतत प्रगती साधली जात आहे. कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शहर विकासाच्या नव्या दिशा ठरवत, नागरिकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू,' असेही ते म्हणाले.

### हर्डीकर यांच्याकडेच जबाबदारी?

महापालिका निवडणुकीची तयारी सुरू आहे. ती जानेवारीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणूक होईपर्यंत हर्डीकर यांच्याकडेच आयुक्तपदाची अतिरिक्त जबाबदारी राहील, अशी शक्यता वर्तविली जात आहे. निवडणुकीनंतरच नवीन आयुक्तांची नियुक्ती होईल, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे.माझ्याकडे आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार दिला आहे.

## महापौरपद प्रतीक्षा सोडतीचा कार्यक्रम जाहीर होण्याकडे लक्ष

# राखीव जागांचे फटाके दिवाळीनंतर फुटणार!

## नव्या मतदारांमुळे समीकरणे बदलणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेतील अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्ग (ओबीसी) तसेच, खुल्या गटातील या सर्व राखीव जागांवर महिलांसाठी असलेल्या जागेचे चित्र कसे असेल, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. आरक्षण सोडतीवर अनेकांचे भवितव्य ठरणार आहे. त्यामुळे या सोडतीकडे अनेकांच्या नजरा लागल्या आहेत. ती सोडत दिवाळीच्या धामधुमीनंतर होईल, असे सूत्रांनी सांगितले.**



महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना अंतिम झाली आहे. आता मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण सुरू आहे. २०१७ प्रमाणेच १२८ जागांसाठी चार सदस्यीय प्रभाग पद्घतीने ही निवडणूक होणार आहे. मात्र, त्या तुलनेत मतदारसंख्या सुमारे पाच लाखांनी वाढली आहे. ही वाढ समाविष्ट गावांत सर्वाधिक असून नवमतदार, नवीन गृहप्रकल्प आणि बांधकामांमुळे वाढलेल्या लोकसंख्येचा परिणाम आहे. या नव्या मतदारांमुळे समीकरणे काही अंशी बदलणार आहेत. महापालिका निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचनेला सोमवारी (ता. ६) मान्यता मिळाली. आता एससी (अनुसूचित जाती), एसटी (अनुसूचित जमाती) आणि ओबीसी (इतर मागासवर्गीय) घटकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर होण्याची आणि महापौरपद आरक्षणाची प्रतीक्षा आहे. राखीव जागांचे फटाके दिवाळीनंतर फुटणार असल्याची शक्यता आहे.

निवडणूक विभागाकडून तयारी सुरू असली तरी दिवाळीनंतर आणखी वेग येणार आहे. दरम्यान, ही निवडणूक ३१ जानेवारी २०२६ पूर्वी होणार हे निश्चित आहे. .२०११ मधील लोकसंख्येचा आधारकोविड प्रतिबंधक नियमांमुळे २०२१ मध्ये जनगणना झालेली नाही. त्यामुळे २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ग्राह्य धरून महापालिका निवडणूक होत आहे. त्यावेळी शहराची लोकसंख्या १७ लाख २७ हजार ६९२ होती. मात्र, आता ती ३० लाखांवर गेल्याचा अंदाज आहे. शहरात पिंपरी, चिंचवड व भोसरी हे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. शिवाय, शहरातील ताथवडे गावाचा समावेश मुळशी विधानसभा मतदारसंघात आहे. २०१७ च्या मतदारसंख्येपेक्षा आताची लोकसंख्या पाच लाखांपेक्षा अधिक संख्येने वाढली असल्याचे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतही दिसून आले आहे. .मतदारयाद्या कार्यक्रम जाहीर नाहीराज्य निवडणूक आयोगाकडून मतदार यादीचा कार्यक्रम अद्याप आलेला नाही. मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून प्रभाग निहाय मतदार यादीचे काम करण्यात येणार आहे. विधानसभेची मतदार यादी फोडून एक ते ३२ अशी प्रभागनिहाय विभागली जाणार आहे. त्यानंतर ३२ मतदार याद्या उपलब्ध होतील. एका प्रभागात साधारणतः ४९ ते ५९ हजार मतदार संख्या असेल.

### सोडतीनंतर हरकती मागविणार

पिंपरी महापालिकेच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आरक्षण सोडतीच्या याद्या दिल्या जातील . महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांकडून पारदर्शक ड्रममधून चिठी काढली जाते. त्यानुसार, त्या प्रभागात महिला व पुरुष असे आरक्षण निश्चित केले जाते. यंदा आरक्षण सोडतीवर हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मागील निवडणुकीसाठी प्रा. मोरे प्रेक्षागृहात ३० जुलै २०२२ ला आरक्षण सोडत काढण्यात आली होती. त्यात ४६ प्रभागातील एकूण १३९ जागांपैकी ११४ जागांची सोयरा आादली गेली. मात्र, ती निवडणूक प्रकिया पुढे रद्द झाली होती. फेब्रुवारी २०१७ च्या निवडणुकीची सोडतही काहण्यात आली होती.

### दृष्टिक्षेपात मतदार

२०१७ च्या निवडणुकीवेळी मतदारसंख्या : ११ लाख ९२ हजार ८९
सद्यःस्थितीत मतदारसंख्या : १७ लाख ८ हजार ७८७
वाढलेले मतदार : ५ लाख १६ हजार ६९८

### शहरातील मतदारसंख्या

| विधानसभा क्षेत्र/ | मतदारसंख्या |
|---|---|
| चिंचवड / | ६, ७९, ८५८ |
| भोसरी / | ६, २९, १२९ |
| पिंपरी / | ३, ९९, ८०० |
| ताथवडे / | ९, ५७५ |

“ राज्य निवडणूक आयोगाकडून पिंपरी चिंचवड महापालिकेला आरक्षण सोडतीचा कार्यक्रम प्राप्त झालेला नाही. त्याबाबतच्या वेळापत्रकानुसार महापालिकेकडून जाहीर सर्वांसमोर आरक्षण सोडत काढली जाईल. त्यासाठी महापालिका निवडणूक विभागाने तयारी केली आहे.
**-अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, निवडणूक विभाग, महापालिका.**

# आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्वीकारला पदभार

## महा-मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक हर्डीकर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनी ‘महा-मेट्रो’चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी महापालिकेच्या आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारला. विशेष म्हणजे, त्यांनी या निमित्ताने मेट्रोने महापालिकेत प्रवेश करत शहराच्या सार्वजनिक वाहतुकीवरील विश्वास दाखवून दिला.**



महापालिकेचे मावळते आयुक्त शेखर सिंह यांची नियुक्ती नाशिक कुंभमेळा आयुक्त म्हणून नुकतीच झाली आहे. सिंह यांच्या जागी हर्डीकर यांना महापालिका आयुक्त म्हणून अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. आज महापालिकेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने हर्डीकर यांनी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत येऊन हा पदभार स्वीकारला. आयुक्त हर्डीकर यांनी महापालिकेत आल्यानंतर सर्वप्रथम पिंपरी चिंचवड शहराचे शिल्पकार माजी खासदार, नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी त्यांच्या समवेत आमदार अमित गोरखे हे देखील उपस्थित होते.

### नागरिकाभिमुख प्रशासन देऊ - आयुक्त श्रावण हर्डीकर

आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर आयुक्त हर्डीकर म्हणाले, ‘पिंपरी चिंचवड महापालिका ही राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक आहे. शहरातील स्वच्छता,पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि डिजिटल प्रशासन या क्षेत्रांत सतत प्रगती साधली जात आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक आणि महापालिका

### प्रशासन. राजकारण्यांची रस्सीखेच


महानगरपालिकेच्या वतीने अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी रस्सीखेच,संगीत खुर्ची यासह विविध खेळांचे आयोजन करण्यात आलेले होते.आयुक्त श्रावण हर्डीकर आणि आमदार अमित गोरखे यांनी रस्सीखेच व संगीत खुर्ची या खेळात सहभाग घेऊन कार्यक्रमाचा आनंद अनुभवला.

# वसाहतवादाच्या वारशाशी लढण्याचे मार्ग




**‘वसाहतवादाचा वारसा’ या शब्दप्रयोगाला आजकाल राजकीय क्षेत्रात अतोनात महत्त्व आलं आहे गेल्या दीड वर्षापासून. कारण तेव्हा आपली राज्यघटना हाच ‘वसाहतवादी वारसा’ असल्यामुळे राज्यघटनाच बदलून टाकू, असा सूर एका विद्वानानं लावला होता. हा विद्वान कोणत्या राजकीय पक्षाकडे झुकलेला, वगैरे चर्चा करण्याची ही जागा नव्हे पण ‘अतोनात’ म्हणजे किती याचं ते उदाहरण होतं.**

त्यानंतर भारत सरकारनंही अनेक कायदे बदलून टाकताना ‘वसाहतवादी वारसा आम्ही पुसतो आहोत’ असा नैतिक पवित्रा घेतला होता. कला ही राजकारणाच्या बाहेरच असायला हवी वगैरे कबूल. पण ‘वसाहतवादाचा वारसा’ हा सांस्कृतिक क्षेत्रातही कसा आहे, याची ‘सेन्गोल’च्या निमित्तानं झालेली चर्चा असो की या देशाची उन्नत बौद्धिक परंपरा परक्या शासकांमुळेच कशी लयाला गेली हे हल्ली सांगू लागलेल्या काही विद्वानांची पुस्तकं असोत, वसाहतवाद या संकल्पनेच्या पुन्हा होत असलेल्या चिकित्सेतून एक सांस्कृतिक मांडणी केली जाऊ शकते, असं सध्या स्पष्ट दिसतं आहे. सांस्कृतिक अंगांसकट ही पुन्हा होणारी चिकित्सा नवीसुद्धा असावी, यासाठी खरं तर इतिहासाइतकंच ‘वसाहतवादी कृतीकार्यक्रमा’कडे- अजेंड्याकडे- नीट पाहावं लागेल, त्यातून वसाहतवाद नेहमी



‘परक्या शासकां’चाच असतो का असाही प्रश्न पडेल. वसाहतवादी अजेंडा हा मूलत: भांडवलदारीचा. वसाहतींमधून कमी दरांत कच्चा माल घ्यायचा आणि वसाहतकार देशात धाडून, मूल्यवर्धन करून तो जास्त दरात विकायचा, हे वसाहतवादामुळे होणारं नुकसान असल्याचं साधार मत दादाभाई नौरोजींनी मांडलं होतं. यात ताज्या चिकित्सेसाठी आवश्यक तपशील असा की, वसाहतवादी ज्या क्षेत्रांत ‘प्रगत’ ठरले होते त्याच क्षेत्रांत वसाहतींमधली प्रजा ‘मागास’ कशी आहे, हे कथ्यकथन (नॅरेटिव्ह) वसाहतकारांनी ठसवलं होतं. या तथाकथित मागास प्रजेच्या संस्कृती- परंपरांचं वैचित्रीकरण (एग्झॉटिसायझेशन) वसाहतकारांनी केलं होतं.

आता आपल्या विषयाकडे येऊ. तो आहे स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोककलांशी भारतीय आणि अभारतीयांनी जी वर्तणूक केली ती या अर्थानं ‘वसाहतवादी’च ठरते, हा. उदाहरणार्थ वारली कलेकडे पाहू. वारली समाजातल्या प्रथांचा भाग असलेली ही कला. पण ‘वारली आर्ट’कडे लक्ष देताना या समाजाच्या अन्य प्रथांचं निव्वळ वैचित्र्य पाहिलं गेलं. वारली कलेबाबत भास्कर कुलकर्णी यांनी ‘वीव्हर्स सर्व्हिस सेंटर’साठी केलेल्या अभ्यासाची चिकित्सा झालेली नाही, पण यशोधरा दालमियांनी जणू याविषयीच्या पहिल्या संशोधक स्वत:च असल्याच्या थाटात लिहिलेल्या ‘पेण्टेड वर्ल्ड ऑफ द वारलीज’ या पुस्तकात वारली जनजीवनाचं वैचित्रीकरण पदोपदी दिसतं. हेच अन्य लोकचित्रकलांबद्दल झालं आहे.

जिव्या सोमा मशे (नेदरलँड्सचा प्रिन्स क्लॉस पुरस्कार- २००९, पद्मश्री- २०११) हे पहिले जगप्रसिद्ध वारली चित्रकार. मशे यांना इटली, जर्मनी आदी देशांत भित्तिचित्रं करण्याची संधी मिळाली, काही युरोपीय कलादालनं त्यांच्या कलाकृती विकायला तयार झाली. आर्थिक व्यवहार पारदर्शक होता का, हा प्रश्नही तेव्हा कुणी विचारला नाही. पण दुसराही मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यांच्या कलाकृतींना प्रसिद्धी मिळाली तसतशी या ‘वारली आर्ट’मधली ‘डिझाइन्स’(!) कॉपी करण्याचा प्रकार सरसकट होऊ लागला. आपण बौद्धिक संपदेची चोरी करतो आहोतशहरोशहरीच्या ‘हॉबी क्लासेस’मध्ये ‘वारली आर्ट’चे वर्ग सुरू झाले. यात काहींनी तर वारली कला आणि साधारण तशीच दिसणारी ओडिशातली ‘सौरा’ शैली यांमध्ये गोंधळ घालून ठेवणाऱ्या तथाकथित डिझाइन्सचा सुळसुळाट केला. हे पाहून दादाभाई नौरोजी नक्कीच संतापले असते. हा झाला पहिला टप्पा. पण जिव्या सोमा मशे काय किंवा राजेश वांगड यांच्यासारखे नंतरच्या पिढीतले चित्रकार काय, त्यांनी बदलत्या भोवतालाला जिथल्या तिथं- जेव्हाचा तेव्हाच प्रतिसाद दिला आणि त्यांच्या चित्रांमध्ये शाळा, डबलडेकर बस, आगगाडी, हॉस्पिटल, ॲम्ब्युलन्स हे सारं येऊ लागलंपुजणाऱ्या सांस्कृतिक परंपरेमधल्या चित्रांत डबलडेकर बस वा ॲम्ब्युलन्स येणं हे सांस्कृतिक गुलामगिरीचं/ शरणागतीचं/ संस्कृतीद्रोहाचं लक्षण ठरवायचं का?

## संपादकीय »

# चौथी दुसरीसारखी?

***एके ठिकाणी येणार याचा वास येताच सत्ताधीशांचे बगलबच्चे कामाला लागतात; तसे वाढवण बंदरासह चौथ्या मुंबईबाबत होऊ नये...***

मुंबईत नव्या विमानतळाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘चौथ्या मुंबई’चे सूतोवाच केले. त्याचे स्वागत. नवी मुंबईतील विमानतळामुळे त्या सगळ्या परिसराचा चेहरा-मोहरा बदलेल. या विमानतळाचे कंत्राट कसे आणि कोणास दिले गेले, त्याची प्रक्रिया आदींबाबत अनेकांस अनेक प्रश्न, भिन्न मते असतील. ते योग्यच.

पण एकदा एखादा प्रकल्प सुरू केल्यावर तो अपेक्षेप्रमाणे तडीस कसा न्यावा याबाबत या सरकारकडून शिकण्यासारखे बरेच काही आहे, हे त्यांचे विरोधकही मान्य करतील. नवी मुंबईतील हा विमानतळ अवघ्या चार वर्षांत आकारास आला.

प्रकल्पाची आखणी, निधी उभारणी आणि पूर्तता इत्यादी मुद्दे गुंतवणूकदार आणि प्रकल्पामुळे होणारी संभाव्य प्रगती यासाठी कळीचे असतात.

**कालिदासच्या ‘कुमारसंभवम्’च्या पहिल्या सर्गातील हा पहिला श्लोक. त्यावरून कळते की हिमालय हा ‘नगाधिराज -पर्वतांचा राजा’ – असल्याचे पहिल्या शतकातील कालिदासालाही माहीत होते. पण केवळ १५८ वर्षांपूर्वीही तो नगाधिराज नेमका केवढा लांबरुंद व किती उंच आहे हे मात्र कुणाला माहीत नव्हते.**

# भूगोलाचा इतिहास : आणि हिमालय

कारण त्यापूर्वी हिमालयाचे मोजमाप कधी करण्यातच आले नव्हते.८०३ मध्ये विलियम लॅम्ब्टन यांनी भारताच्या ‘ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हे’ची सुरुवात केली, त्याच सुमारास चार्ल्स क्रॉफर्ड हा ब्रिटिश पथकप्रमुख पूर्व नेपाळमध्ये गेला होता. या भागातील पर्वत व शिखरे अतिप्रचंड असल्याचे त्याच्याकडून इतरांना समजले. ते ऐकून कर्नल वेब या ब्रिटिश सेनाधिकाऱ्याने १८०९-१० मध्ये त्या भागातील शिखरांची उंची मोजली. तेथील ‘धवलगिरी’ हे शिखर २६ हजार फुटाहून उंच असल्याचे त्याने जाहीर केले. मात्र त्यावर कुणाचा विश्वासच बसला नाही. कारण दक्षिण अमेरिकेत बोलेव्हियातील अँडीज पर्वताचे ‘अंकोह्युमा’ ( उंची २३ हजार १२ फूट) हे त्याकाळी जगातले सर्वोच्च शिखर मानले जाई. पण हिमालय हा जगातला सर्वात उंच पर्वत असण्याची शक्यता क्रॉफर्ड व वेब यांच्यामुळे भूसंशोधकांच्या लक्षात आली. दरम्यान मराठा राज्य लयास गेले. ब्रह्मदेशही जिंकल्यावर




बहुतेक भारत व हिमालयाचाही बराच भाग इंग्रजांच्या अधिपत्याखाली आला. त्यामुळे हिमालयाची मोजमापे घेणे व नकाशे तयार करणे शक्य होऊ लागले. पण नेपाळ व तिबेटमध्ये मात्र परकीयांना मज्जाव होता. १८४३ मध्ये जॉर्ज एव्हरेस्ट निवृत्त झाल्यावर ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हेचे नेतृत्व कर्नल अँड्र्यू वॉ यांचेकडे आले. त्यांच्या काळात हिमालयातील शिखरांची उंची निश्चित करण्याचे काम सुरू झाले. हिमालयाच्या रांगा पूर्व पश्चिम पसरलेल्या आहेत. त्यापैकी भारताच्या बाजूने लागणाऱ्या पहिल्या कमी उंचीच्या रांगांना ‘शिवालिक टेकड्या’ म्हणतात. त्यानंतर अधिक उंचीच्या ‘मध्य हिमालय’ व त्याच्या पलीकडे सर्वात उंच ‘बृहद् हिमालय’ या रांगा आहेत. या तिन्ही रांगांच्या पलीकडे ज्या रांगा आहेत, त्यांना ‘पार हिमालय’ (ट्रान्स हिमालय) म्हणतात.हिमालयातील सर्वोच्च शिखरे मध्य व बृहद् हिमालय रांगांत आहेत. पण अलीकडे असणाऱ्या शिवालिक टेकड्यांमुळे, त्यांच्या पलीकडची उंच शिखरे दिसत नाहीत. मात्र उत्तर बंगालमध्ये, दार्जिलिंग परिसरात शिवालिक रांगा नाहीत. त्यामुळे अगदी दूरवरून, दार्जिलिंग येथूनही, या भागातील कांचनजंगा व इतर शिखरांचे दर्शन घडते. या सर्व पार्श्वभूमीवर कर्नल वॉ यांनी या परिसरातील शिखरांची मोजणी करण्याचे ठरवले. या भागातील ७९ शिखरांची उंची व नकाशातील स्थान निश्चित करण्याचे कार्य, वॉ यांच्या नेतृत्वाखाली १८४९ ते १८५५ मध्ये हाती घेण्यात आले. या शिखरांचे वेधही दूरवरूनच घ्यावे लागणार होते. कारण यापैकी बहुतेक शिखरे तिबेट आणि नेपाळमध्ये होती. आणि तिथे परकीयांच्या प्रवेशावर कठोर निर्बंध होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक ⁝ MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक ⁝ वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक ⁝ सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**काँग्रेस पक्षाचा पाठिंबा**

## काँग्रेस जिल्हाध्यक्ष देशमुखांचा प्रशासनास इशारा

# आमदारांचे दलाल म्हणून काम करू नका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

## हे वर्तन सहन केले जाणार नाही

**अधिकारी संविधान आणि शासनाचे प्रतिनिधी आहेत. पण, ते भाजप आमदार डॉ. अतुल भोसले यांचे दलाल (एजंट) म्हणून काम करत आहेत, हे वर्तन सहन केले जाणार नाही. वेळप्रसंगी कार्यालयात येऊन अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासू, असा इशारा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिला.**



### बोगस मतदान झाल्याचे निदर्शनास

याप्रसंगी कापील गावात बोगस मतदान झाल्याचे निदर्शनास आणून, यास अधिकारी आणि अव्वल कारकून जबाबदार असल्याचा आरोप आंदोलनकर्ते गणेश पवार यांनी केला. या आरोपाच्या पार्श्वभूमीवर देशमुख बोलत होते. यावेळी काँग्रेसचे कराड दक्षिण तालुकाध्यक्ष नामदेव पाटील, अजित पाटील, प्रदीप जाधव आदींची उपस्थिती होती.

कराड तहसील कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते गणेश पवार यांनी सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील बोगस मतदानप्रकरणी मागील दोन दिवसांपासून सुरू केलेल्या धरणे आंदोलनाला रणजितसिंह देशमुख यांनी उपोषणस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांना काँग्रेस पक्षाचा पाठिंबा जाहीर केला.याप्रसंगी कापील गावात बोगस मतदान झाल्याचे निदर्शनास आणून, यास अधिकारी आणि अव्वल कारकून जबाबदार असल्याचा आरोप आंदोलनकर्ते गणेश पवार यांनी केला. या आरोपाच्या पार्श्वभूमीवर देशमुख बोलत होते. यावेळी काँग्रेसचे कराड दक्षिण तालुकाध्यक्ष नामदेव पाटील, अजित पाटील, प्रदीप जाधव आदींची उपस्थिती होती.रणजितसिंह देशमुख म्हणाले, विधानसभेच्या कराड दक्षिण मतदारसंघात बाहेरील जिल्ह्यातील लोकांची मतदार नोंदणी करून मोठ्या प्रमाणात मत चोरी करण्यात आली. हे सरकारच मत चोर आणि गद्दार आहे. राहुल गांधींनी अशा अन्यायाविरोधात देशव्यापी आंदोलन उभे केले असून, गणेश पवार यांचे हे आंदोलन त्याच लढ्याचा एक भाग असल्याचे देशमुख यांनी सांगितले. अजित पाटील यांनीही आमदार डॉ. अतुल भोसले व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर सडकून टीका केली. शेतकऱ्यांपासून ते मतदारांपर्यंत सगळ्यांची फसवणूक करणाऱ्या या सरकारविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरली असून, हे आंदोलन न्यायाचा लढा असल्याचे पाटील यांनी सांगितले. कराड तहसील कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते गणेश पवार यांनी सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील बोगस मतदानप्रकरणी मागील दोन दिवसांपासून सुरू केलेल्या धरणे आंदोलनाला रणजितसिंह देशमुख यांनी उपोषणस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांना काँग्रेस पक्षाचा पाठिंबा जाहीर केला.याप्रसंगी कापील गावात बोगस मतदान झाल्याचे निदर्शनास आणून, यास अधिकारी आणि अव्वल कारकून जबाबदार असल्याचा आरोप आंदोलनकर्ते गणेश पवार यांनी केला. या आरोपाच्या पार्श्वभूमीवर देशमुख बोलत होते. यावेळी काँग्रेसचे कराड दक्षिण तालुकाध्यक्ष नामदेव पाटील, अजित पाटील, प्रदीप जाधव आदींची उपस्थिती होती.रणजितसिंह देशमुख म्हणाले, विधानसभेच्या कराड दक्षिण मतदारसंघात बाहेरील जिल्ह्यातील लोकांची मतदार नोंदणी करून मोठ्या प्रमाणात मत चोरी करण्यात आली. हे सरकारच मत चोर आणि गद्दार आहे. राहुल गांधींनी अशा अन्यायाविरोधात देशव्यापी आंदोलन उभे केले असून, गणेश पवार यांचे हे आंदोलन त्याच लढ्याचा एक भाग असल्याचे देशमुख यांनी सांगितले. अजित पाटील यांनीही आमदार डॉ. अतुल भोसले व प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर सडकून टीका केली. शेतकऱ्यांपासून ते मतदारांपर्यंत सगळ्यांची फसवणूक करणाऱ्या या सरकारविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरली असून, हे आंदोलन न्यायाचा लढा असल्याचे पाटील यांनी सांगितले.अधिकारी संविधान आणि शासनाचे प्रतिनिधी आहेत. पण, ते भाजप आमदार डॉ. अतुल भोसले यांचे दलाल (एजंट) म्हणून काम करत आहेत, जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिला. पवार यांनी सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील बोगस मतदानप्रकरणी मागील दोन दिवसांपासून सुरू केलेल्या धरणे आंदोलनाला रणजितसिंह देशमुख यांनी उपोषणस्थळी मागण्यांना काँग्रेस पक्षाचा पाठिंबा जाहीर केला.

# झिरवळ यांच्या कार्यशैलीवर भाजप नाराज

## मंजूर कामांना स्थगितीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा नाराजीचा सूर उमटला आहे. ठाकरे गटाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी त्यांच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त केल्यानंतर आता भाजपचे आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी पालकमंत्र्यांनी मंजूर केलेल्या अनावश्यक कामाला स्थगिती देण्याची लेखी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.**



### विकासकामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित

आमदार मुटकुळे यांनी हिंगोली शहरात मंजूर करण्यात आलेल्या सुमारे दोन कोटी रुपयांच्या विकासकामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. या कामांची आवश्यकता नसतानाही ती मंजूर करण्यात आली आहेत. प्रत्यक्ष पाहणी न करता फक्त कागदोपत्री निर्णय घेतले, असे मुटकुळे यांनी म्हटले आहे.

आमदार मुटकुळे यांनी हिंगोली शहरात मंजूर करण्यात आलेल्या सुमारे दोन कोटी रुपयांच्या विकासकामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. या कामांची आवश्यकता नसतानाही ती मंजूर करण्यात आली आहेत. प्रत्यक्ष पाहणी न करता फक्त कागदोपत्री निर्णय घेतले, असे मुटकुळे यांनी म्हटले आहे. या अनावश्यक मंजूर कामांना स्थगिती द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या पत्रानंतर महायुतीत बेबनाव असल्याचे समोर आले आहे.पालकमंत्री झिरवळ यांच्या जिल्ह्यातील उपस्थितीबाबतही गेल्या काही महिन्यांपासून असमाधान व्यक्त होत आहे. जिल्ह्याच्या प्रमुख पदावर असूनही ते नांदेड येथे मुक्कामी थांबतात आणि हिंगोलीत काही तासांसाठी येतात, अशी नाराजी व्यक्त केली जाते. अतिवृष्टीनंतर पालकमंत्र्यांनी जिल्ह्याचा दौरा न केल्यानेही त्यांच्यावर टीका होत आहे. याच पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी पूर्वीच मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून झिरवळ यांची कार्यशैली बदलण्याची मागणी केली होती. त्यांनी म्हटले होते की,'पालकमंत्री मोठा जिल्हा सांभाळू इच्छित असतील तर त्यांना तशी संधी द्यावी, या शब्दात पालकमंत्रीच बदला, असे सूचविण्यात आले आहे. अनावश्यक पथदिवे, हायमास्ट, एलईडी लाईट या कामांवर दोन कोटींचा निधी खर्च करण्याच्या प्रस्तावास पालकमंत्री यांनी मंजुरी दिली. वास्तविक त्या भागामध्ये रस्ते, सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यासह इतर कामांची आवश्यकता आहे. म्हणून पालकमंत्र्यांनी अनावश्यक मंजूर केलेल्या कामाच्या प्रस्तावास स्थगिती देण्याची मागणी जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरीआता भाजपचे आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी पालकमंत्र्यांनी मंजूर केलेल्या अनावश्यक कामाला स्थगिती देण्याची लेखी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

पाकिस्तानला इशारा! अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील संबंध ताणले

# अफगाणिस्तानचा पाकिस्तानला इशारा!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तालिबानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी शुक्रवारी भारताला आश्वासन दिले की, अफगाणिस्तानच्या भूमीतून कोणालाही कोणत्याही देशाविरुद्ध कारवाया करू देणार नाही. पहिल्यांदाच भारत दौऱ्यावर आलेले अमीर खान मुत्ताकी यांनी पत्रकार परिषदेत पाकिस्तानला इशारा दिला की, "पाकिस्तानने अफगाणी लोकांच्या धैर्याची परीक्षा घेऊ नये".**

## अफगाणिस्तानची परीक्षा घेऊ नये





पाकिस्तानने काबूलमधील तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानच्या छावण्यांवर हल्ले सुरू केल्यामुळे अफगाणिस्तानने हा कठोर इशारा दिला आहे. पाकिस्तानने म्हटले आहे की, पाकिस्तानला लक्ष्य करणाऱ्या दहशतवाद्यांकडून अफगाणिस्तानच्या भूमीचा सतत वापर होत असल्याने त्यांचा संयम सुटला आहे.पाकिस्तानचे हे कृत्य चुकीचे आहे. अफगाणिस्तानात ४० वर्षांनंतर शांतता आणि प्रगती सुरू झाली आहे. त्यामुळे अफगाणिस्तानच्या धैर्याची परीक्षा घेऊ नये. जर कोणाला असे करायचे असेल तर त्यांनी सोव्हिएत युनियन, अमेरिका आणि नाटोला विचारावे, जेणेकरून ते अफगाणिस्तानशी खेळ करणे चांगले नाही हे योग्य प्रकारे सांगू शकतील", असे तालिबानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी म्हणाले.गेल्या काही महिन्यांत दहशतवादी कारवायांमुळे अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले आहेत. या तणावपूर्ण संबंधांमुळे भारताला तालिबानशी संबंध वाढवण्याची संधी मिळाली आहे.शुक्रवारी मुत्ताकी यांनी हैदराबाद हाऊस येथे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत भारताने काबूलमधील आपला दूतावास पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुत्ताकी यांनी प्रादेशिक स्थिरतेसाठी आश्वासन देताना म्हटले की, "आम्ही सुरक्षा सहकार्यावर सविस्तर चर्चा केली आहे. आम्ही कोणालाही कोणत्याही देशाविरुद्ध अफगाणिस्तानची भूमी वापरू देणार नाही."याचबरोबर त्यांनी भारताच्या विकास प्रकल्प सुरू ठेवण्याच्या आणि त्यांचा विस्तार करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले आणि द्विपक्षीय व्यापारातील अडथळे दूर करण्यासाठी संयुक्त व्यापार समिती स्थापन करण्याची घोषणा केली.मुत्ताकी यांनी अफगाणिस्तानातील कारवायांबद्दल पाकिस्तानला कठोर इशाराही दिला. "आम्ही पाकिस्तान सरकारला इशारा देऊ इच्छितो की, या दृष्टिकोनातून समस्या सोडवल्या जाऊ शकत नाहीत. अफगाणिस्तानात पाकिस्तानच्या कृतीचा आम्ही निषेध करतो.अफगाणिस्तानातील लोकांच्या संयमाला आणि धैर्याला आव्हान देऊ नये,"

## पाकिस्तान सरकारला इशारा

आम्ही कोणालाही कोणत्याही देशाविरुद्ध अफगाणिस्तानची भूमी वापरू देणार नाही."याचबरोबर त्यांनी भारताच्या विकास प्रकल्प सुरू ठेवण्याच्या आणि त्यांचा विस्तार करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले आणि द्विपक्षीय व्यापारातील अडथळे दूर करण्यासाठी संयुक्त व्यापार समिती स्थापन करण्याची घोषणा केली.मुत्ताकी यांनी ."आम्ही पाकिस्तान सरकारला इशारा देऊ इच्छितो की, या दृष्टिकोनातून समस्या सोडवल्या जाऊ शकत नाहीत.

असे ते म्हणाले.पाकिस्तानने काबूलमधील तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानच्या छावण्यांवर हल्ले सुरू केल्यामुळे अफगाणिस्तानने हा कठोर इशारा दिला आहे. पाकिस्तानने म्हटले आहे की, पाकिस्तानला लक्ष्य करणाऱ्या दहशतवाद्यांकडून अफगाणिस्तानच्या भूमीचा सतत वापर होत असल्याने त्यांचा संयम सुटला आहे.पाकिस्तानचे हे कृत्य चुकीचे आहे. अफगाणिस्तानात ४० वर्षांनंतर शांतता आणि प्रगती सुरू झाली आहे. त्यामुळे अफगाणिस्तानच्या धैर्याची परीक्षा घेऊ नये. जर कोणाला असे करायचे असेल तर त्यांनी सोव्हिएत युनियन, अमेरिका आणि नाटोला विचारावे, जेणेकरून ते अफगाणिस्तानशी खेळ करणे चांगले नाही हे योग्य प्रकारे सांगू शकतील", असे तालिबानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी म्हणाले.गेल्या काही महिन्यांत दहशतवादी कारवायांमुळे अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले आहेत. या तणावपूर्ण संबंधांमुळे भारताला तालिबानशी संबंध वाढवण्याची संधी मिळाली आहे.शुक्रवारी मुत्ताकी यांनी हैदराबाद हाऊस येथे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत भारताने काबूलमधील आपला दूतावास पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुत्ताकी यांनी प्रादेशिक स्थिरतेसाठी आश्वासन देताना म्हटले की, "आम्ही सुरक्षा सहकार्यावर सविस्तर चर्चा केली आहे.

# काबूलमध्ये पुन्हा भारतीय दूतावास

## परराष्ट्रमंत्री जयशंकर-मुत्ताकी यांच्यातील चर्चेनंतर घोषणा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताने शुक्रवारी काबूलमधील आपल्या तांत्रिक मिशनला दूतावासाचा दर्जा देण्याची घोषणा केली आणि अफगाणिस्तानमधील विकासकामे पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन दिले. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनीही भारताच्या सुरक्षा चिंतांबद्दल संवेदनशीलता दाखवल्याबद्दल अफगाणिस्तानातील तालिबान राजवटीचे कौतुक केले.**



सहा दिवसांच्या दौऱ्यावर गुरुवारी नवी दिल्ली येथे आलेले अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्याशी व्यापक चर्चेदरम्यान जयशंकर यांनी ही घोषणा केली.ऑगस्ट २०२१मध्ये तालिबानने सत्ता काबीज केल्यानंतर भारताने काबूलमधील आपल्या दूतावासातील अधिकाऱ्यांना माघारी बोलावले होते.

जून २०२२ मध्ये, भारताने 'तांत्रिक पथक' तैनात करून अफगाणिस्तानच्या राजधानीत आपली राजनैतिक उपस्थिती पुन्हा स्थापित केली होती. बैठकीत जयशंकर यांनी सीमापार

## काबूल भारतात राजदूत पाठवणार

सुधारण्याच्या टप्प्याटप्प्याने प्रयत्नांचा एक भाग म्हणून काबूल भारतात राजदूत पाठविणार असल्याची घोषणा अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी शुक्रवारी केली. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी व्यापक चर्चेनंतर काही तासांनी झालेल्या पत्रकार परिषदेत मुत्ताकी यांनी ही महत्त्वाची माहिती दिली.अफगाणिस्तानच्या भूमीवर अफगाण हितसंबंधांना हानी पोहोचवणाऱ्या कोणत्याही कृतीला परवानगी दिली जाणार नाही.

दहशतवाद दोन्ही देशांसाठी एक समान धोका असल्याचे सांगितले आणि दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी भारत आणि अफगाणिस्तानला समन्वित प्रयत्न करावे लागतील असे सांगितले. भारत आणि अफगाणिस्तान दोघांचीही विकास आणि समृद्धीसाठी सामायिक वचनबद्धता असल्याचेदेखील ते म्हणाले.

भारत अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि स्वातंत्र्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध असल्याचे जयशंकर म्हणाले.

# ६६ वर्षीय प्रसिद्ध गायक चौथ्यांदा लग्न करणार?

मनोरंजनसृष्टीतील कलाकार हे त्यांच्या कलाकृतींबरोबरच त्यांच्या खासगी आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत असतात. ओ सनम, क्यूँ चलती है पवन अशा गाण्यांसाठी ओळखला जाणारा गायक लकी अली(LUCKY ALI) आता त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. याबरोबरच, त्याच्या कॉन्सर्टसाठीदेखील तो ओळखला जातो. याबरोबरच, गायकाच्या खासगी आयुष्यामुळेदेखील अनेकदा तो चर्चेत असतो. याआधी त्याची तीन लग्न झाली आहेत. आता एका कार्यक्रमात त्याला चौथे लग्न करण्याची इच्छा असल्याचे त्याने म्हटले आहे. दिल्लीमधील सुंदर नर्सरी येथे पार पडलेल्या १८ व्या कथाकार इंटरनॅशनल स्टोरीटेलर फेस्टिव्हल मध्ये लकी अली सहभागी झाला होता.या ठिकाणी त्यांनी सादरीकरणाबरोबरच त्याच्या काही गाण्यांचे किस्सेदेखील सांगितले आहे. या सगळ्यात या कार्यक्रमात लकी अलीने केलेले वक्तव्य सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. त्याला विचारण्यात आले की त्याचे पुढचे स्वप्न काय आहे? त्यावर लगेच उत्तर देत ६६ वर्षीय लकी अलीने म्हटले, "माझं स्वप्न आहे की मला पुन्हा लग्न करायचे आहे." लकी अलीच्या या वक्तव्यानंतर तो लग्नगाठ बांधणार का, यावर चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. गायकाच्या वक्तव्याचे अनेक तर्क वितर्क लावले जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, लकी अलीने याआधी तीन वेळा लग्न केले आहे.

# घटस्फोटाबाबत मयुरी पहिल्यांदाच झाली व्यक्त



अस्मिता' या मालिकेमुळे अभिनेत्री मयुरी वाघला घराघरांत लोकप्रियता मिळाली. या मालिकेने एकेकाळी रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. याच मालिकेच्या सेटवर मयुरी आणि पियुष रानडे यांची मैत्री झाली, पुढे हा प्रवास लग्नापर्यंत येऊन पोहोचला. मात्र, वर्षभरानंतर दोघांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. याबाबत अभिनेत्री पहिल्यांदाच मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्त झाली आहे. मयुरी वाघ मधली काही वर्षे सोशल मीडियापासून दूर होती. पहिल्यांदाच तिने वैयक्तिक आयुष्याविषयी सौमित्र पोटे यांच्या 'मित्र म्हणे'च्या मुलाखतीत भाष्य केलं आहे. लग्नाबाबत विचारल्यावर मयुरी म्हणाली, "मला आता कोणत्याच गोष्टींचं रिग्रेट नाहीये. पण, मी लग्नाचा निर्णय फारच लवकर घेतला असं मला वाटतं. कारण, मी आताची पिढी पाहतेय...लोक फार विचार करून लग्न करतात.

# ट्विंकल खन्नाच्या घराची विक्री

अभिनेता अक्षय कुमार(AKSHAY KUMAR) हा काही दिवसांपासून त्याच्या स्काय फोर्स या चित्रपटामुळे चर्चेत होता. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पाहायला मिळाले. आता मात्र अभिनेता त्याच्या चित्रपटमुळे नाही, तर त्याने घर विकल्यामुळे चर्चेत आला आहे. अक्षय कुमार व ट्विंकल खन्ना यांनी त्यांचे मुंबईतील लक्झरी अपार्टमेंट विकले आहे. मुंबईतील ओबेरॉय ३६० पश्चिम प्रकल्पातील हे अपार्टमेंट सी फेसिंग आहे. आता या सेलेब्रिटी जोडप्याने हे अपार्टमेंट किती रुपयांना विकले, हे जाणून घेऊ...मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय कुमार व ट्विंकल खन्ना यांनी हे अपार्टमेंट ८० कोटी रुपयांना विकले आहे. इंडेक्सटॅप (INDEXTAP)च्या नियंत्रणात असलेल्या मालमत्तेच्या कागदपत्रांनुसार,अक्षय कुमार व ट्विंकल खन्ना यांचे अपार्टमेंट ओबेरॉय ३६० पश्चिम प्रकल्पात ३९ व्या मजल्यावर आहे. ६,८३० चौरस फूट इतकी या अपार्टमेंटची जागा आहे. अक्षय-ट्विंकलच्या अपार्टमेंटची प्रतिचौरस फूट किंमत १.१७ लाख आहे. या अपार्टमेंटला चार कार पार्किंगचीसुद्धा जागा आहे. ३१ जानेवारीला नोंदणी केलेल्या कागदपत्रांनुसार ४.८० कोटी रुपये मुद्रांक शुल्क म्हणून भरण्यात आले आहेत.अक्षय कुमार-ट्विंकल खन्ना यांच्याशिवाय ओबेरॉय ३६० पश्चिम प्रकल्पात अन्य काही बॉलीवूड कलाकारांचेही सोई-सुविधांनी युक्त असे अपार्टमेंट आहे. त्यामध्ये शाहिद कपूर, अभिषेक बच्चन यांचा समावेश आहे. शाहिद कपूर व मीरा कपूर यांनी मे २०२४ मध्ये ५,३९५ चौरस फूट क्षेत्रफळ असलेले अपार्टमेंट खरेदी केले होते. त्याची किंमत ६० कोटी इतकी होती.दरम्यान, अक्षय कुमारने याआधी मुंबईतील बोरिवली-पूर्व येथील एक अपार्टमेंट ४.२५ कोटींना विकले होते. हे अपार्टमेंट त्याने नोव्हेंबर २०१७ मध्ये २.३८ कोटी रुपयांना खरेदी केले होते.

# आईने दिला खास सल्ला



मुली साधारण १३- १४ वर्षांच्या झाल्या की त्यांचं आरशामध्ये स्वतःला पाहण्याचं प्रमाण एकदमच वाढून जातं. येता जाता त्या आरशात डोकावून पाहतात. आजवर कधीही आपण कसे दिसतो आहोत, याची काळजी न करणाऱ्या मुली वाढत्या वयाच्या झाल्या की स्वतःच्या दिसण्याबाबत जास्तच जागरुक होतात. त्यांची हेअरस्टाईल, कपड्यांचा चॉईस यातही बदल होत जातो. आणि बहुतांश मुलींच्या डोक्यात त्याच काळात आपण किती वाईट दिसतो, आपण अजिबातच सुंदर नाही, आपण खूपच कशातरीच दिसतो असे किडे वळवळायला लागतात. यातून कित्येक मुलींचा कॉन्फिडन्स तर जातोच पण त्यांचं अभ्यासातही लक्ष लागत नाही. अशीच अवस्था झाली होती अभिनेत्री शिल्पा शेट्टीची (SHILPA SHETTY REVEALS HER CHILDHOOD MEMORIES). ती म्हणे स्वतःला कुरूप (UGLY) म्हणून रोज खूप रडायची..

# सिद्धार्थ चोप्राने प्रसिद्ध अभिनेत्रीशी केलं लग्न



'देसी गर्ल' प्रियांका चोप्राचा भाऊ सिद्धार्थ चोप्रा लग्नबंधनात अडकला आहे. सिद्धार्थने अभिनेत्री नीलम उपाध्यायशी लग्नगाठ बांधली. सिधार्थ व नीलम यांच्या लग्नातील पहिला व्हिडीओ समोर आला आहे. व्हिडीओमध्ये या दोघांच्या लग्नातील झलक पाहायला मिळत आहे. सिद्धार्थ चोप्राने लग्नात आयव्हरी रंगाची शेरवानी घातली होती, तर नीलमने लाल रंगाचा लेहेंगा परिधान केला होता. प्रियांकाने आकाशी रंगाचा सुंदर डिझायनर इंडो वेस्टर्न लेहेंगा परिधान केला होता. लग्नाच्या स्टेजवर प्रियांका चोप्रा भाऊ सिद्धार्थला घेऊन आली. तर, नीलमने गाण्यावर तिथे एंट्री केली, नंतर प्रियांकाने नीलमचं स्वागत केलं आणि तिला मंचावर घेऊन गेली. यावेळी निक जोनास व कुटुंबातील इतर सदस्य जबाबदाऱ्या पार पाडताना दिसले.सिद्धार्थ व नीलम यांच्या लग्नाआधीचे कार्यक्रम २-३ दिवसांपासून सुरू होते. हळदी व मेहंदी समारंभ दणक्यात पार पडला. त्यानंतर त्यांचा संगीत सोहळा गुरुवारी रात्री पार पडला. त्यांच्या संगीत सोहळ्याला अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. आज सिद्धार्थ व नीलमचे मुंबईत लग्न झाले. त्यांच्या लग्नाला मनारा चोप्रा व तिचे कुटुंबीय तसेच परिणीती चोप्रा व तिचे पती राजकारणी राघव चड्ढा यांनी हजेरी लावली होती. रेखा व नीता अंबानीदेखील सिद्धार्थच्या लग्नाला उपस्थित राहिले.सिद्धार्थ चोप्राबद्दल बोलायचं झाल्यास तो प्रियांकाचा धाकटा भाऊ आहे. तो बहीण प्रियांकाचे प्रॉडक्शन हाऊस पर्पल पेबल पिक्चर्स सांभाळतो. तसेच त्यांनी हॉटेल व्यवसायही केला आहे. सिद्धार्थ त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत राहिला. कारण दोनदा त्याचं लग्न साखरपुड्यानंतर मोडलं. त्याने गर्लफ्रेंड कनिका माथुरशी साखरपुडा केला होता, पण तो मोडला. त्यानंतर २०१९ मध्ये त्याने इशिता कुमारशी साखरपुडा केला होता, पण लग्नाच्या काही दिवसांआधीच ते वेगळे झाले. तो साखरपुडा मोडल्यानंतर काही काळाने त्याच्या आयुष्यात अभिनेत्री नीलम उपाध्याय आली. दोघेही एकमेकांना डेट करू लागले. त्यानंतर त्यांनी २०२४ मध्ये साखरपुडा केला. त्यांच्या साखरपुड्याला प्रियांका चोप्रा व निक जोनास आले होते.

दोघेही मैदानात कोसळले

## यशस्वी जैस्वाल १७३ धावांवर नाबाद

# गिल-इमलॅच यांच्यात जोरदार धडक!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि वेस्टइंडिज यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याचा थरार दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियममध्ये सुरू आहे. या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिलने पहिल्यांदाच नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय सार्थ ठरवत भारतीय संघाने पहिल्याच दिवशी २ गडी बाद ३१८ धावांचा डोंगर उभारला आहे. यशस्वी जैस्वाल १७३ धावांवर नाबाद आहे. तर कर्णधार शुबमन गिल २० धावांवर नाबाद आहे.**

## गिल २० धावांवर नाबाद



कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधारपदाची जबाबदारी मिळाल्यापासून गिलला एकदाही नाणेफेक जिंकता आलं नव्हतं. वेस्टइंडिजविरूद्धच्या दुसऱ्या कसोटीदरम्यान नाणेफेकीचा कौल भारतीय संघाच्या बाजूने लागला आणि भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या केएल राहुल आणि यशस्वी जैस्वालने पहिल्या विकेटसाठी ५८ धावांची भागीदारी केली. केएल राहुल ३८ धावा करत माघारी परतला. त्यानंतर यशस्वी जैस्वाल आणि साई सुदर्शन यांनी मिळून दुसऱ्या विकेटसाठी १९३ धावांची भागीदारी केली. जैस्वालने आपलं शतक पूर्ण केलं. तर साई सुदर्शन आपलं पहिलं शतक पूर्ण करण्यापासून १३ धावा दूर राहिला. तो ८७ धावांवर बाद होऊन माघारी परतला.साई सुदर्शन बाद होऊन माघारी परतल्यानंतर कर्णधार शुबमन गिल फलंदाजीला आला. गिल आणि जैस्वाल स्ट्राईकवर असताना ८५ वे षटक टाकण्यासाठी अँडरसन फिलिप गोलंदाजीला आला. या षटकातील पाचवा चेंडू यशस्वी जैस्वालने मिडविकेटच्या दिशेने ढकलला. त्यावेळी क्षेत्ररक्षकाने चेंडू अडवला आणि वेगाने यष्टिरक्षकाच्या दिशेने फेकला. त्यावेळी शुबमन गिल आणि यष्टिरक्षक यांच्यात जोरदार धडक झाली.ही धडक इतकी जोरदार होती की, गिल आणि टेविन इमलॅच दोघेही पडले. त्यामुळे फिजिओला मैदानावर यावं लागलं आणि सामना काही मिनिटे थांबवण्यात आला होता. त्यावेळी यशस्वी जैस्वाल गिलची फिरकी घेताना दिसला. तो गिल बोटं दाखवताना दिसून आला. हा मजेशीर व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.भारत आणि वेस्टइंडिज यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याचा थरार दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियममध्ये सुरू आहे. या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिलने पहिल्यांदाच नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय सार्थ ठरवत भारतीय

### सामना थांबवण्यात आला

सामना काही मिनिटे थांबवण्यात आला होता. त्यावेळी यशस्वी जैस्वाल गिलची फिरकी घेताना दिसला. तो गिल बोटं दाखवताना दिसून आला. हा मजेशीर व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.भारत आणि वेस्टइंडिज यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याचा थरार दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियममध्ये सुरू आहे.

संघाने पहिल्याच दिवशी २ गडी बाद ३१८ धावांचा डोंगर उभारला आहे. यशस्वी जैस्वाल १७३ धावांवर नाबाद आहे. तर कर्णधार शुबमन गिल २० धावांवर नाबाद आहे.कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधारपदाची जबाबदारी मिळाल्यापासून गिलला एकदाही नाणेफेक जिंकता आलं नव्हतं. वेस्टइंडिजविरूद्धच्या दुसऱ्या कसोटीदरम्यान नाणेफेकीचा कौल भारतीय संघाच्या बाजूने लागला आणि भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या केएल राहुल आणि यशस्वी जैस्वालने पहिल्या विकेटसाठी ५८ धावांची भागीदारी केली. केएल राहुल ३८ धावा करत माघारी परतला. त्यानंतर यशस्वी जैस्वाल आणि साई सुदर्शन यांनी मिळून दुसऱ्या विकेटसाठी १९३ धावांची भागीदारी केली. जैस्वालने आपलं शतक पूर्ण केलं. तर साई सुदर्शन आपलं पहिलं शतक पूर्ण करण्यापासून १३ धावा दूर राहिला. तो ८७ धावांवर बाद होऊन माघारी परतला.साई सुदर्शन बाद होऊन माघारी परतल्यानंतर कर्णधार शुबमन गिल फलंदाजीला आला. गिल आणि जैस्वाल स्ट्राईकवर असताना ८५ वे षटक टाकण्यासाठी अँडरसन फिलिप गोलंदाजीला आला. या षटकातील पाचवा चेंडू यशस्वी जैस्वालने मिडविकेटच्या दिशेने ढकलला. त्यावेळी क्षेत्ररक्षकाने चेंडू अडवला आणि वेगाने यष्टिरक्षकाच्या दिशेने फेकला. त्यावेळी शुबमन गिल आणि यष्टिरक्षक यांच्यात जोरदार धडक झाली.ही धडक इतकी जोरदार होती की, गिल आणि टेविन इमलॅच दोघेही पडले.

## मोहसीन नक्वींनी तर हद्दच केली!

# मोहसीन नक्वींनी भारताने जिंकलेली आशिया चषक ट्रॉफी केल कैद

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानला पराभूत करत जेतेपद आपल्या नावे केलं. पण जेतेपद पटकावूनही भारतीय संघाला अद्याप स्पर्धेची ट्रॉफी देण्यात आलेली नाही. आशियाई क्रिकेट परिषद आणि पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी सामन्यानंतर ट्रॉफी घेऊन पळून गेले आणि आता त्यांनी खरोखरच एक धक्कादायक गोष्ट केली आहे. मोहसिन नक्वींनी आशिया कप ट्रॉफी कैद केली आहे.**




भारतीय संघाने संपूर्ण आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानविरूद्ध तीन सामने खेळले. गट टप्प्यातील सामना, सुपर फोर टप्पा आणि नंतर अंतिम सामना; या तिन्ही सामन्यांमध्ये भारताने पाकिस्तानचा पराभव केला, पण सामन्यादरम्यान किंवा सामन्यानंतर कोणत्याही पाकिस्तानी खेळाडूशी हस्तांदोलन केलं नाही किंवा त्यांच्याशी चर्चा केली नाही. यानंतर भारतीय संघाने जेतेपद पटकावल्यानंतर मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी घेण्यास नकार दिला.मोहसीन

### ट्रॉफी दुबईच्या कार्यालयात बंद

मोहसिन नक्वी यांनी असेही निर्देश दिले आहेत की त्यांच्या परवानगीशिवाय ट्रॉफी काढू नये किंवा भारतालाही देऊ नये. भारताने त्यांच्या हस्ते ट्रॉफी घेण्यास नकार दिल्यानंतर ते ट्रॉफी स्वत: बरोबर घेऊन गेले आणि तेव्हापासून ही ट्रॉफी एसीसी कार्यालयात आहे.

नक्वी हे आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आहेत, याशिवाय ते पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष आहेत आणि पाकिस्तानचे गृहमंत्रीदेखील आहेत. त्यामुळे संघाने त्यांच्याकडून ट्रॉफी न स्वीकारण्याचा निर्णय घेतला. तर नक्वींनी देखील भारतीय संघाला इतर कोणाच्याही हस्ते ट्रॉफी देण्यापेक्षा ते ट्रॉफी घेऊन पळून गेले. आता ही ट्रॉफी नक्वी यांनी एसीसीच्या ऑफिसमध्ये बंद करून ठेवत कोणीही याला हात लावू नये अशी सक्त ताकिद दिली.रिपोर्ट्सनुसार, आशिया चषक ट्रॉफी दुबईतील एसीसीच्या मुख्यालयात बंद करून ठेवण्यात आली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार।

। दि. 11 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# “महाराष्ट्राचे आयर्लंड”



पुणे: “महाराष्ट्राचे आयर्लंड” सह्याद्री खोऱ्यातील पाटणच्या डोंगर घाट माथ्यावरून नजरेत भरणारे निसर्गरम्य असे काठी आयलँड सध्या पर्यटकान करिता लक्षवेधी ठरले आहे. (फोटो: विजयकुमार हरिश्चंद्रे)

## तंत्रज्ञाAन विकासामुळे समाजोन्नती व लोककल्याणाला चालना

# "एआय" मानवी विचार पद्धतीला पूरक साधन - निलेश येवला

## शिक्षण विश्व: पीसीसीओईआर मध्ये 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन' स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आजचा काळ आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा म्हणजे “एआय” चा आहे. हे केवळ तंत्रज्ञान नाही, तर मानवी विचार पद्धतीला पूरक असलेलं स्मार्ट साधन आहे. या तंत्रज्ञाना मुळे तुमचे विचार आणि संकल्पना अधिक व्यापक होतील व तुमचा दृष्टिकोन अधिक चांगला होण्यासाठी सामर्थ्य मिळेल. “एआय” हे नवोपक्रमाचं केंद्रबिंदू बनलं आहे. या हॅकेथॉनमध्ये तुम्ही एखाद्या समस्येवर उपाय शोधत असताना त्याला “एआय” ची साथ दिली. तर ते केवळ तांत्रिक नव्हे तर स्मार्ट उपाय उपलब्ध करून देईल. “एआय” शिकणं म्हणजे फक्त कोडिंग शिकणे नाही. तर डेटामधून अर्थ शोधून भविष्यातील दिशा निश्चित करणे आहे.केले.**



"एआय" हे मानवाच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी पूरक आणि मार्गदर्शक ठरेल. सध्या यामुळे उद्योगात अधिक वेगाने आणि अचूकपणे निर्णय होत असल्याने आरोग्य, शेती, शिक्षण, वाहतूक अशा सर्व क्षेत्रांत आमूलाग्र परिवर्तन घडत आहे असे कॅपजेमिनी, पुणे, वरिष्ठ संचालक निलेश येवला यांनी "एआय" संशोधनाचे महत्त्व यावर मार्गदर्शन करताना सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च येथे स्मार्ट इंडिया हॅकेथॉन या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. हरीश तिवारी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी एक्सेंचर, पुणे सहयोगी व्यवस्थापक श्रीकांत सावलकर, एचएसबीसी, वरिष्ठ सल्लागार दीपक रसाळ, इन्फोसिस, पुणे चे सचिन पोतदार, डेव्हऑप्स मैत्रीटेक, मुंबईचे मनोज किनगे, टचकोर कंपनीचे वरिष्ठ सॉफ्टवेअर विकास अभियंता विशाल महाजन, एचसीएल टेक्नॉलॉजीज तांत्रिक आर्किटेक्ट शिरीष चौधरी, ॲमडॉक्सचे वरिष्ठ सॉफ्टवेअर डेव्हलपर धोंडूतात्या मठपती यांनी उपस्थित राहून परीक्षण केले. उपप्राचार्य प्रा. डॉ. राहुल मापारी, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. डॉ. अर्चना चौगुले, संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. विजय कोतकर, समन्वयीका दिप्ती चौधरी आदी उपस्थित होते.

ही स्पर्धा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल अंतर्गत घेण्यात आली. देशभरातील विद्यार्थ्यांना विविध समस्यांवर उपाय शोधण्यासाठी ही स्पर्धा प्रेरित करते. या मध्ये ४५० पेक्षा जास्त विद्यार्थी संघ सहभागी झाले होते. त्यापैकी ५० संघांची पुढच्या फेरी साठी निवड करण्यात आली.

पीसीसीओईआर चे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले की, हॅकेथॉन सारख्या स्पर्धांमुळे नवीन संकल्पनाची निर्मिती करण्यास प्रोत्साहन मिळते. यामध्ये प्रकल्प सादर करण्यासाठी प्रथम ती समस्या समजून घेणे. त्याच्या मुळाशी पोहचणे आणि विश्लेषण करून त्यावर उपाय शोधून निराकरण झाले तर यश मिळेल. स्मार्ट इंडिया हॅकेथॉन म्हणजे केवळ स्पर्धा नाही, तर समाजातील वास्तविक समस्यांना डिजिटल पर्याय शोधण्याचा मार्ग आहे. तुमच्या प्रोजेक्टचा उद्देश समाज उपयोगी असावा असे डॉ. तिवारी यांनी सांगितले. स्वागत समन्वयीका प्रा. दिप्ती चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. तृप्ती खेरडे आणि प्रा. दिपा महाजन यांनी आभार मानले. अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे. विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विधायक पुढाकार

# आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी पिंपरी-चिंचवडकरांची वज्रमुठ

## आपत्तीग्रस्त मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यात तब्बल 50 गाड्या मदत रवाना!

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाडा व सोलापूर जिल्ह्यासह अन्य भागातील पूरग्रस्त शेतकरी, कष्टकरी यांना “एक हात मदतीचा” या उद्देशाने पिंपरी-चिंचवडमधून एकाच दिवशी तब्बल 50 गाड्या मदत रवाना झाली. आपत्तीग्रस्त भागातील 100 हून अधिक गावांमधील सुमारे 18 हजार 400 कुटुंबांना ही मदत वितरीत करण्यात येणार आहे. या विधायक उपक्रमाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले आहे.**





हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा उपक्रम हाती घेण्यात आला. लोकसहभागातून तब्बल 50 ट्रक मदत उभारण्यात आली. यामध्ये जीवनाश्यक वस्तु, अन्नधान्याचा समावेश आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे गाड्यांचे पूजन करण्यात आले आणि मदत मराठवाड्यात रवाना झाली. यावेळी आमदार महेश लांडगे आणि भाजपाचे आजी-माजी पदाधिकारी तसेच हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. मराठवाड्यातील पूरग्रस्त कुटुंबांना मदतीचे कीट वितरीत करण्यात येणार आहे. त्यासाठी 50 गाड्या आणि प्रत्येक वाहनासोबत चार ते पाच स्वयंसेवक असे 300 सहकार्यांसह ही मदत रवाना केली आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील भाजपा महायुती सरकारने राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 31 हजार 628 कोटी रुपयांचे मदत पॅकेज घोषित केले. पुरामुळे आपल्या जीवितहानी झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना राज्य सरकारने 4 लाख रुपये अनुकंपा रक्कम देण्याची घोषणा केली आहे. पशु आणि पाळीव प्राण्यांच्या नुकसानाची भरपाई, घरांच्या आणि इमारतींच्या नुकसानाची भरपाई, महायुती सरकारतील मंत्री, विधानसभा आणि लोकसभा सदस्य एक महिन्याचा पगार मुख्यमंत्री आपत्ती निवारण कोषात दान करण्याचा निर्णय केला आहे. राज्य सरकार सर्वोतोपरी मदतकार्य करीत आहे. लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात मदतकार्य करीत आहोत. मानवता जपणे ही आपली संस्कृती आहे.

मराठवाड्यातील पिंपरी-चिंचवडमध्ये वास्तव्य करणारे पिंपरी-चिंचवडकर यांच्यासह भारतीय जनता पार्टी, विविध स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या माध्यमातून लोकसहभागातून मदत उभी करण्यात आली.

> “ महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी आपत्ती आली, तर पिंपरी-चिंचवडकरांना मानवतेच्या दृष्टीकोनातून पुढकार घेतला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पूरपरिस्थिती व कोकणातील निसर्ग चक्रीवादळ सारख्या संकटामध्ये आम्ही “एक हात मदतीचा” हा उपक्रम हाती घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आता पुन्हा एकदा मराठवाड्यातील पूरग्रस्तांची दिवाळी गोड करण्याचा आम्ही निर्धार केला आहे. आम्ही पिंपरी-चिंचवडकर आणि मित्र परिवार सहकारी यांच्या योगदानातून भरीव मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या टप्प्यात जीवनाश्यक वस्तू, दुसऱ्या टप्प्यात गोधन दान आणि तिसऱ्या टप्प्यात शैक्षणिक मदत व सहकार्य देण्याचा संकल्प आहे.
>
> **- महेश लांडगे,**
> **आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

## पूरग्रस्त बांधवांची दिवाळी होणार गोड!

## आतिश बारणे यांचा पुढाकार; राष्ट्रवादी काँग्रेसकडून मदतीचा हात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाड्यासह सोलापूर, करमाळा भागामध्ये पावसामुळे विदारक परिस्थिती निर्माण झाली. संपूर्ण शेती पाण्याखाली गेली असून, शेतकरी बांधव सर्व काही गमावून बसला आहे. ऐन दसरा दिवाळीच्या तोंडावर या संकटात सापडलेल्या आपल्या बळीराजाला मदतीचा हात पुढे करत पूरग्रस्त बांधवांची दिवाळी गोड करण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष आतिश बारणे यांनी घेतला आहे.**




> “ पूर परिस्थितीमुळे महाराष्ट्राच्या अनेक भागात शेतकरी, नागरिक संकटात आहेत. दसरा दिवाळीच्या तोंडावर संकटात असलेल्या आपल्या या बांधवांना दिलासा देऊन मदतीचा हात पुढे करणे गरजेचे आहे. संकटाच्या काळात एकमेकांना मदतीचा हात देणं ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे. पुरामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. यामध्ये खारीचा वाटा उचलत आपल्या बांधवांना सावरण्याचे काम हाती घेतले आहे.
>
> **-आतिश बारणे,**
> **उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर**

अतिश बारणे यांच्या पुढाकारातून पूरग्रस्त बांधवांसाठी 1000 मदतीचे किट वाटप करण्यात येणार आहे.या मदत किटमध्ये अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, स्वच्छतेसाठी साहित्य आणि वैद्यकीय सामग्रीचा समावेश आहे. तसेच दिवाळीसाठी वस्तू देखील देण्यात आल्या आहेत.

पूरग्रस्त भागातील नागरिकांना तातडीची मदत मिळावी, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असल्याचे आतिश बारणे यांनी सांगितले.

## मिशन PCMC: महापालिका निवडणुकीसाठी

# सोसायटी फेडरशेनचाही "जाहीरनामा"!

### फेडरेशनतर्फे 'विचार मंथन' : शहरातील सोसायटीधारकांची भूमिका ठरणार निर्णायक

**| पिंपरी चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज**

**आगामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, शहरातील सोसायटीधारकांची भूमिका अधिक ठोस करण्यासाठी चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनतर्फे विशेष 'विचार मंथन' बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.ही महत्त्वपूर्ण बैठक येत्या रविवारी, १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता ऐश्वर्यम बँक्वेट हॉल, बिकानेर स्वीटमार्ट शेजारी, गोल्ड जिम समोर, फेडरेशन ऑफिस समोर, बोऱ्हाडेवाडी मोशी येथे पार पडणार आहे, अशी माहिती चिखली- मोशी- चऱ्होली - पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी दिली.**

शहरातील एकूण मतदानापैकी तब्बल ९० टक्के मतदान सोसायटीधारकांचे असून, या बहुसंख्य मतदारांचा आवाज एकत्र करून, त्यांच्या अपेक्षा, मागण्या आणि दृष्टिकोन या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहेत. या बैठकीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधीची योग्यता, पात्रता, शिक्षण, तसेच त्याच्याकडून असणाऱ्या सोसायटीधारकांच्या अपेक्षांवर सखोल चर्चा होणार आहे.

शहरातील नागरी समस्यांपासून ते सोसायटीच्या मूलभूत प्रश्नांपर्यंत सर्व मुद्द्यांचा या चर्चेत विचार केला जाईल.

**जाहीरनामा संकल्पनेची घोषणा**

फेडरेशनतर्फे या बैठकीतून एक संयुक्त निवडणूक जाहीरनामा तयार केला जाणार असून, तो सर्व राजकीय पक्षांसमोर सादर केला जाईल.

हा जाहीरनामा केवळ मागण्या मांडणारा नसून, तो एक दिशादर्शक दस्तावेज ठरणार आहे, जो लोकप्रतिनिधींनी काम करताना मार्गदर्शक म्हणून वापरावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बैठकीनंतर, फेडरेशनमार्फत शहरातील सर्व सोसायट्यांमध्ये संवाद दौरा राबविण्यात येणार असून, प्रत्येक सोसायटीधारकाचे मत जाणून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.हा दौरा म्हणजे केवळ संवादच नव्हे, तर शहर विकासासाठी नागरिक सहभागाचे एक सक्षम माध्यम ठरेल.



"पिंपरी-चिंचवड शहराच्या एकूण मतदानापैकी सोसायटीधारकांचे 90 टक्के मतदान आहे. त्यामुळे मतदानामध्ये बहुसंख्य असणाऱ्या मतदारांना या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये निवडून जाणाऱ्या लोकप्रतिनिधीकडून काय अपेक्षा आहेत? स्थानिक लोकप्रतिनिधीची काय योग्यता पात्रता असावी? याबद्दल चर्चा विनिमय करून सोसायटीधारकांच्या अपेक्षांचा जाहीरनामा सर्व पक्षांसाठी जाहीर केला जाणार आहे.

**-संजीवन सांगळे,**
**- अध्यक्ष, चिखली- मोशी- चऱ्होली - पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046